देशोन्नती

# कटकवार विद्यालयात सायबर सिक्युरिटी मार्गदर्शन




साकोली : कृष्णमुरारी कटकवार विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय साकोली येथे क्विक हिल फाउंडेशन तर्फे सायबर सिक्युरिटी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाला मानसी शेंडे व पूर्वा लांजेवार यांनी मार्गदर्शन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय देवगीकर यांनी पुष्पगुच्छ देऊन मानसी शेंडे व पूर्वा लांजेवार यांचे विद्यालयाच्या वतीने स्वागत केले. आजच्या प्रगत युगाच्या काळात सामान्य जनतेची जी दिशाभूल करून फसवणूक करण्यात येते, याकरिता जनतेने कसे सावध असावे याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. मार्गदर्शनात सोशल मीडिया, फ्रॉड कॉल्स, ई-मेल लिंक, सेफ्टी अबाउट पर्सनल डिटेल इन्फॉर्मेशन बद्दल अतिशय महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेकरीता बी एस लंजे, संजय पारधी, मते, नेवारे, मडकवार, बिसेन, विठ्ठले, शाहू, शिवदास लांजेवार, संजय भेंडारकर, अविनाश मेश्राम, शिवपाल चन्ने, दिनेश उईके, पुष्पा बोरकर, नीलिमा गेडाम, अनुराधा रणदिवे आदी सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. (ता.प्र.)

Bhandara Edition Edition
Aug 31, 2024 Page No. 6
Powered by: erelego.com